# प्रकरण ३
# ऐतिहासिक पध्दती

संशोधन प्रक्रिया

संशोधन म्हणजे काय हे समजून घेतल्यानंतर आपण संशोधनासाठी आवश्यक ती माहिती गोळा करण्याच्या पद्धती समजून घेतल्या. या प्रकरणात आपण प्रत्यक्ष इतिहास संशोधन प्रक्रिया समजून घेणार आहोत. इतिहास हे कल्पनारम्य लिखाण नव्हे तर एक शास्त्र आहे ही भूमिका एकदा स्वीकारली की शास्त्रीय संशोधन कसे असते हे समजून घेणे ओघाने येते. इतिहास हे सामाजिक शास्त्र असल्यामुळे इतर सामाजिक शास्त्रांप्रमाणेच इतिहासाचीही संशोधन प्रक्रिया असते.

१) समस्या सूचना (*Formulation of Problem*) -

ही संशोधन प्रक्रिया विषय निश्चितीपासून खरे तर सुरू होते. विषयाचे क्षेत्र निश्चित झाले की त्या नवधीचे संशोधन करण्याचा निश्चित प्रश्न, नेमका विषय स्पष्टपणे लक्षात घ्यावा लागतो. याला समस्यासूत्रण असे म्हणता येईल. इतिहासाच्या अभ्यासातून आपल्याला जाणवते ती त्रुटी जी आपण आपल्या संशोधनातून करू इच्छितो. त्या त्रुटीचे समस्येचे सूत्रीकरण करणे म्हणजे समस्यासूत्रण होय. आपल्या संशोधन विषयाचे स्वरूप व दिशा निश्चित करून विषयाला सूत्ररूप देणे या समस्यासूत्रणात अपेक्षित असते. या स्वासूत्रणाच्याच वेळी आपण ज्या विषयावर संशोधन करणार आहोत तो विषय शुद्ध मूलभूत प्रकारचा आहे, काही नवी माहिती प्रकाशात आणणारा आहे की पुनर्मूल्यांकन, पुनर्विश्लेषण करणारा, क्रियाभिमुख कार प्रकारचा आहे हे स्पष्ट करावे लागते.

- गृहीतक निश्चित करणे (*Fourmulation Of Hypothesis*) -

इतिहासाच्या संशोधनालाही इतर सामाजिक शास्त्रांप्रमाणे संशोधन कार्याच्या प्रारंभी काही गृहीतके चित करून त्या अनुषंगाने विचार करावा लागतो. प्रस्थापित ज्ञानाच्या आधारावरच हे गृहीतक उभे उदाहरणार्थ प्राचीन काळात स्त्रियांना समाजात विशेष मान नव्हता, त्यांचा प्रशासनातही विशेष नव्हता ही गोष्ट प्रस्थापित आहे. परंतु स्त्रियांच्या प्रशासकीय सहभागाचे काही संदर्भ सापडले तर आधारे असे गृहीतक तयार करता येते की प्राचीन काळातील स्त्रिया प्रशासनात सहभागी होत्या. हेगृहीतक संशोधनाअंती खरे किंवा खोटे ठरते. संशोधन समस्येची विधानाच्या स्वरूपातली मांडणी गृहीतका (*Hypothesisi*) मध्ये केली जाते. एका अर्थाने गृहीतकात अनुमान काढलेले असते जे संशोधनाआधारे तपासले, संशोधिले जाते. याचाच अर्थ असाही होतो की संशोधनाविषयी केलेले तात्कालिक पूर्वानुमान म्हणजे गृहीतक होय. या पूर्वानुमानाचेच संशोधन करावयाचे असते. संशोधनाचा तो प्रमुख आधार असतो. या गृहीतकातल्या अनुमानाचे संशोधनातून परीक्षण होत असते व त्यातून संशोधनाचे तथ्य हाती येते. दुसऱ्या शब्दांत लिहायचे झाल्यास गृहीतकृत्य हे संशोधनाचे संभाव्य उत्तर असते.

गृहीतकामुळे संशोधनाची दिशा निश्चित होते. निष्कर्ष काढण्यासाठीदेखील गृहीतक मार्गदर्शक ठरते. म्हणूनच डॉक्टर हॉट यांनी त्यांच्या मेथड इन सोशल रिसर्च या ग्रंथात म्हटले आहे की, 'गृहीतकृत्याशिवाय होणारे सामाजिकशास्त्र शाखेतील संशोधन दिशाहीन ठरते.' तात्पर्य, गृहीतकामुळे संशोधनातील निष्कर्ष काढायला मदत होते. संशोधनाला नेमकेपणा येतो, मर्यादा स्पष्ट होतात. संशोधनाद्वारे गृहीतकाचीच चाचणी होत असते.

) संदर्भग्रंथांची यादी तयार करणे *Preparation of Bibliography* -

३ संशोधन विषयाचे समस्यासूत्रण केले, गृहीतक निश्चित केले की त्यानंतर विषयानुषंगाने संदर्भग्रंथाची यादी तयार करणे ही संशोधन प्रक्रियेची पुढची पायरी होय. समस्यासूत्रणाचा विषय निश्चित झालेला असला तरी त्या समस्येसंबंधातील दूरान्वयानेदेखील संबंधित असलेले सर्व ग्रंथ अभ्यासणे अगत्याचे ठरते. अशा अभ्यासग्रंथांची यादी प्रथम तयार करावी. एखादा संदर्भग्रंथ हाती आला की तो तर नोंदवून घ्यावाच पण त्या ग्रंथाच्या शेवटी इतर अनेक ग्रंथांची नोंद असते ज्या आधारे हा ग्रंथ रचलेला असतो. या ग्रंथांपैकी काही ग्रंथ आपल्या संशोधनास उपयुक्त असतात. म्हणजेच एका ग्रंथातून आणखी पंचवीस एक ग्रंथांची नावे आपल्या हाती येतात. जेवढा व्यापक शोध आपण घेऊ तेवढी संदर्भसूची (बिब्लीऑग्राफी) परिपूर्ण पणे तयार होईल.

संदर्भग्रंथ नोंदीची पद्धती -

संदर्भग्रंथांची नोंद करताना खालील गोष्टींची काळजी घेतली पाहिजे. या नोंदींचा संशोधनपद्धतीत एक क्रम निश्चित करण्यात आला आहे. त्या क्रमानुसार या नोंदी असाव्यात. त्या दृष्टीने खालील गोष्टी लक्षात ठेवाव्यात.

१) सुरुवातीला लेखकाचे, भाषांतरकाराचे अथवा संपादकाचे नाव त्यानंतर स्वल्पविराम.
२) त्यानंतर ग्रंथाचे नाव आणि अर्धविराम,
३) त्यानंतर ग्रंथाची आवृत्ती, खंडात्मक लिखाण असल्यास खंडाचा क्रमांक, प्रकाशन स्थळ, प्रकाशकाचे नाव, प्रकाशन वर्ष. नंतर पूर्णविराम.

लेखकाच्या नावाची नोंद करताना एक विशिष्ट क्रम अंगीकारणे आवश्यक असते. लेखक, संपादक, भाषांतरकार यांचे नाव नोंदवताना प्रथम आडनाव त्यानंतर नावाची आद्याक्षरे किंवा प्रथम नाव यावे. एकापेक्षा अधिक लेखकांनी एकच ग्रंथ लिहिला असेल तेव्हा दुसऱ्या लेखकाचे नाव आडनावाने सुरू केले तरी चालते. लेखक मंडळात तीन पेक्षा अधिक नावे असतील तर फक्त पहिल्या लेखकाचे नाव देण्याचा प्रघात आहे.

ग्रंथाची नोंद करताना ग्रंथाचे पूर्ण नाव, उपनाव व इतर तपशील साधारणतः रेखांकित करतात किंवाछापताना वेगळ्या टाईपात छापतात. पूर्ण नाव व उपनाव यांमध्ये विसर्ग देण्याचा प्रघात आहे. त्यानंतर येणारी आवृत्तीची नोंद, अर्धविराम, खंड क्रमांक व प्रकाशन स्थळ यांच्या नोंदी करण्यात येतात. त्यात विशेष असा तपशील नाही. एखाद्या ग्रंथाचे पुनर्मुद्रण असेल तर पुनर्मुद्रणाचे वर्ष याचीही नोंद आवश्यक असते. उदाहरण म्हणून काही इंग्रजी ग्रंथांच्या नोंदी खालीलप्रमाणे करता येतील.

*Saletore B.A. Social & Political life in the Vijaynagar Empire, Vol. I & II, Ma- dras: B.G. Paul & Co.,* 1934.
डॉ. कुलकर्णी अ.रा. शिवकालीन महाराष्ट्र, पुणे, राजहंस प्रकाशन, १९९३.

आद्याक्षर वर्णानुक्रम यादी -
संशोधन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर आपण वाचलेल्या संदर्भ ग्रंथांची यादी ही सामान्यपणे आद्याक्षरांच्या क्रमानुसार तयार करून प्रबंधाच्या शेवटी जोडावयाची असते. या संदर्भ ग्रंथाच्या यादीचे *Bibliography* चे दोन प्रकार आहेत. एक प्रकार निवडक यादीचा. यात अशाच ग्रंथांचा समावेश असतो ज्या ग्रंथांचे संदर्भ प्रबंधात दिलेले आहेत. दुसरा प्रकार व्यापक यादीचा. यात वाचलेल्या सर्वच ग्रंथांचा समावेश होतो. ग्रंथांचा संदर्भ दिलेला असो वा नसो, विषयसंबंधित सर्वच ग्रंथाची यादी या प्रकारामुळे पुढे संशोधन करणाऱ्या संशोधकास उपलब्ध होते. त्याचबरोबर संशोधकाचे विषयज्ञानही त्यातून स्पष्ट होते.

प्रबंधात जोडावयाच्या संदर्भग्रंथ यादीची विभागणी वेगवेगळ्या गटांत केली जाते. संदर्भग्रंथ किंवा प्रकाशित वा अप्रकाशित वाङ्मय हे एका अर्थाने इतिहासाचे महत्त्वपूर्ण साधन. अशा साधनांच्या वर्गवारीवर संदर्भग्रंथांची वर्गवारी अवलंबून आहे. प्रथम दर्जाची साधने ही एक प्रमुख वर्गवारी. यात समकालीन प्रकाशित ग्रंथ व इतर महत्त्वपूर्ण दर्जाच्या लिखाणाचा समावेश होतो. प्रकाशित आणि अप्रकाशित अशा दोन्ही प्रकारच्या लिखाणाची नोंद यात केली जाते. दुसऱ्या वर्गवारीत दुय्यम दर्जाच्या ग्रंथांचा समावेश होतो. घटना घडून गेल्यानंतर, कालांतराने त्या घटनेविषयी झालेले लिखाण या प्रकारात मोडते. हे लिखाण पुनर्मूल्यांकनात्मक, पुनर्विश्लेषणात्मक असते किंवा कित्येकदा घटनेविषयी ढोबळमानाने माहिती देणारे असते. तिसरी वर्गवारी आहे नियतकालिकांची, संशोधन पत्रिकांची. वा प्रत्येक विभागातील ग्रंथाची यादी आद्यक्षर क्रमानुसार करावयाची असते हे लक्षात घ्यावे. कालिकांची व संशोधनपत्रिकांची विभागणी सामान्यपणे करीत नाहीत.

### ४) **संदर्भवाचन** (*Reference Work) -*

इतिहास संशोधन प्रक्रियेतील पुढचा टप्पा संदर्भवाचनाचा आहे. संशोधनातील माहिती गोळा करण्याची पद्धती कोणतीही असो त्या माहितीचे विश्लेषण करण्यापूर्वी संदर्भवाचन आवश्यक आहे. संदर्भवाचन हा संशोधनाचा मूळ गाभा आहे. संशोधन विषयाचे स्वरूप, व्याप्ती समजण्यासाठी जसे हे संदर्भवाचन आवश्यक आहे तसेच विश्लेषणासाठी परीक्षणासाठी आणि पुनर्मूल्यांकनासाठीही ते आवश्यक आहे.

हे संदर्भवाचन कसे करावयाचे? नोट्स व टिप्पणी कशी काढावयाची याचे तंत्र समजून घेतले पाहिजे, नसता ग्रंथाचे फक्त वाचन होईल आणि हाती काहीच येणार नाही. आपण वाचलेल्या ग्रंथातील उपयुक्त माहिती सर्व तपशिलांसह लिहून काढणे म्हणजे संदर्भग्रंथातील टिप्पणी घेणे-नोट्स काढणे होय. या नोट्स एक तर वहीतून लिहिता येतात; परंतु अशा वह्यांतून नोट्स घेणे बऱ्याचदा गैरसोईचे असते. विषयाच्या विश्लेषणासाठी निरनिराळ्या प्रकारच्या

माहितीचे वर्गीकरण वेगवेगळ्या गटांत करावे लागते. अशा वेळी या वह्या गैरसोयीच्या ठरतात. त्यासाठी माहितीच्या प्रत्येक प्रकारासाठी वेगळी वही करणे हा उपाय होऊ शकतो; परंतु त्यासाठी असंख्य वह्या वापराव्या लागतील व त्यांचे वर्गीकरणही कठीण ठरेल.

संशोधन पध्दती म्हणजे संशोधन करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पध्दती किंवा तंत्रे होत. संशोधन पध्दतीचा वापर करुन संशोधक आपले संशोधनाचे कार्य पूर्ण करण्याचा प्रयत्न करतो. संशोधन पध्दतीमुळे काही पध्दती अशा असतात की, ज्यांचा संबंध माहिती गोळा करण्यासाठी असतो. संशोधन पध्दतीमुळे माहिती कशी गोळा करावी, ती मिळविण्याचे मार्ग जुने झाले तर नविन मार्ग कोणते इत्यादींचे ज्ञान होते. काही वेळा समस्या सोडविण्यासाठी साधने उपलब्ध नसतात. तेव्हा अन्य मार्गाने माहिती गोळा करण्यासाठी संशोधन पध्दतीचा उपयोग होतो. संशोधन पध्दतीद्वारे संशोधन करीत असतांना ज्ञात आणि अज्ञात माहितीची सांगड घालू शकतो. संशोधन पध्दतीद्वारे संशोधक त्याला लागणारी माहिती गोळा करतो. गोळा केलेल्या माहितीचे वर्गीकरण करतो. संशोधन पध्दतीमुळे संशोधकाला तथ्य संकलनाच्या तंत्राची माहिती मिळते. जमविलेल्या तथ्यांची प्राथमिक व दुय्यम साधनांत विभागणी करून संशोधन पूर्ण करण्यास मदत होते.

**संशोधन विश्लेषणात्मक प्रक्रिया (*Analytical Process)***

विविध प्रकारची माहिती संकलीत केल्यानंतर त्यांचे वर्गीकरण करावे लागते. संकलीत केलेली माहिती अस्ताव्यस्त विखुरलेली असल्यामुळे त्यांना व्यवस्थित क्रमवारीने लावणे गरजेचे असते. त्यामुळे गोळा केलेल्या साधनांमधील साम्य, भेद आणि इतर आधारांवर त्यांचे वर्गीकरण केले जाते. वर्गीकरणासाठी संख्यात्मक गुणात्मक अशा दोन्ही पध्दतींचा अवलंब केला जातो.

तथ्य संकलन केल्यानंतर संशोधनातील विश्लेषणाची महत्वाची । पायरी सुरू होते. विश्लेषणानंतरच निष्कर्ष काढणे आणि सिध्दांत निर्मिती करणे शक्य होते. तथ्यांचे वर्गीकरण करणे, त्यांचे सांकेतीकरण करणे आणि त्यानंतर शास्त्रीय निष्कर्ष काढणे या सर्व गोष्टींचा समावेश विश्लेषणाच्या प्रक्रियेत होतो. तथ्यांचे विश्लेषण केल्यानंतर
स्पष्ट होण्यासाठी तथ्यांचे विश्लेषण होणे आवश्यक असते. विश्लेषणानंतरच निष्कर्ष काढणे आणि सिध्दांत निर्मिती करणे शक्य होते. प्राथमिक आणि दुय्यम स्रोतांचा वापर करुन प्राप्त केलेली माहिती विस्तृत असते. त्यामुळे ही माहिती सामान्य निष्कर्ष काढण्यास आणि सिध्दांत निर्मिती करण्यास उपयुक्त ठरण्यासाठी विश्लेषणाची प्रक्रिया महत्वाची पायरी असते.

१) अनुमानीय (*Heuristics)* 'ह्यूरिस्टिक' हा एक ग्रीक शब्द आहे. हा शब्द 'ह्यूरिसको' या शब्दापासून बनला आहे. याचा अर्थ 'मी शोध करीत आहे' असा होतो. याची उत्पत्ती प्रसिध्द वैज्ञानिक आर्कमिडीज यांच्यापासून झाली. खरे तर अनुमानीय या संशोधन प्रक्रियेचे जनक आर्मस्ट्राँग यांनी या प्रक्रियेचा उपयोग प्रथमतः रसायनशास्त्रातील विषयाच्या शिक्षणासाठी केला. या पध्दतीचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे संशोधकाला किंवा विद्यार्थ्याला संकलीत केलेल्या कागदपत्रांतून स्वतःच्या अनुमानाने निष्कर्ष काढायचे असतात. प्रोफेसर आर्मस्ट्राँग यांनी म्हटले आहे की, "*Heuristics method is a method of teaching which involves our placing the students as far as possible in the attitude of a discoverer.*" इतिहासाचे संशोधन करत असताना ऐतिहासिक साधनसामुग्री गोळा करावी लागते. मूळ ऐतिहासिक साधनसामग्रीच्या संकलनानंतर त्या साधनांची सत्यासत्यता पडताळून पाहणे गरजेचे ठरते. इतिहास म्हणजे गतकाळाची कपोलकल्पीत कथा नसून जे प्रत्यक्ष घडले त्याचे निवेदन इतिहास लेखनात अपेक्षित असते. गतकाळात काय घडले, कसे घडले ही माहिती देण्याचे काम मूळ ऐतिहासिक कागदपत्रे करतात. परंतु त्यातून मिळणारे माहितीचे परीक्षण करणे आवश्यक असते. परीक्षणाचा टप्पा चिकित्सात्मक व विश्लेषणात्मक स्वरूपाचा असते. यासाठी संशोधकाला कुशाग्र, तल्लख बुध्दी, निरक्षीरविवेक आणि कायम शंकेखोर वृत्तीचा वापर करणे गरजेचे असते. ज्या घटना घडल्या आणि जशा घडल्या याची शहानिशा करावी लागते. त्यातून विश्वासार्हतेच्या निष्कर्षाप्रत पोहचावे लागते. त्यातून मिळालेल्या माहितीचा उपयोग इतिहास लेखनात करता येतो. हा इतिहासलेखनाचा मूळ आधार असतो. या संदर्भात हॉकेट म्हणतात की, "घटनानिश्चिती हा परीक्षणाचा मुख्य उद्देश असतो, कारण पुढील सर्व प्रक्रियांचा मूळ आधार ह्या घटना असतात."

बाह्यांग परीक्षण

संकलित केलेली ऐतिहासिक कागदपत्रातील माहिती पुराव्यायोग्य आहे की नाही हे निश्चित करण्यासाठी संशोधकाला परीक्षणाची प्रक्रिया करावी लागते. आणि कागदपत्रांचे परीक्षण करण्यासाठी केल्या जाणाऱ्या प्रक्रियांपैकी एक प्रक्रिया अनुमानीय किंवा बाह्यांग परीक्षणाची होय. इंग्रजीत '*Heuristics*' असे म्हणतात.

ऐतिहासिक कागदपत्रे हाती आल्यानंतर त्याची सत्यता पारखून घेण्यासाठी, त्या कागदपत्राच्या खरेपणाविषयी स्वतःच शंका उपस्थित करून, स्वतःलाच प्रश्न विचारुन अनुमान काढावे लागतात.

बाह्यांग परीक्षण ही ऐतिहासिक कागदपत्रांच्या तपासणीची प्राथमिक प्रक्रिया आहे. ऐतिहासिक कागदपत्रे हाती आल्यानंतर त्याची सत्यता पारखून घेण्यासाठी, त्या कागदपत्राच्या खरेपणाविषयी स्वतःच शंका उपस्थित करून, स्वतःलाच प्रश्न विचारुन अनुमान काढावे लागतात. ते काही प्रश्न असे - संशोधनासाठी निवडलेल्या विषयासंबंधी तो कागद आहे की नाही ? कागद मूळ स्वरुपात आहे की नक्कल आहे ? कागदाचा लेखक संशोधन विषयाच्या काळाशी निगडीत आहे का ? कागदात आलेला विषय संशोधनविषयाच्या काळाशी सुसंगत आहे की नाही ? कागदात स्थळाचा उल्लेख आहे का? असल्यास तो संशोधन विषयाच्या स्थळ मर्यादशी जुळतो का? ह्या कागदपत्रांचा हेतू हा मूळ कागदपत्राचा लेखक, स्थळ व काळ निश्चित करणे हा असतो. ह्यालाच बाह्यांग परीक्षण म्हणतात. सारांश असा की, बाह्यांग परीक्षणाचा उद्देश मूळ कागदपत्रांची सत्यासत्यता तपासण्याचा असतो.

संकलित केलेल्या ऐतिहासिक साधनांपैकी विषयाशी निगडीत एखादी कडी हाती लागत नाही. माहितीत काही त्रूटी असल्याचे जाणवते. ही पोकळी भरून काढण्यासाठी संकलित केलेल्या ऐतिहासिक साधनांचा पुरेसा आधार मिळत नाही. ही पोकळी भरुन काढणे तर आवश्यक असते. नाही तर लिखाणात / संशोधनात तुटकपणा जाणवतो. अशा वेळी विधायक तर्कशुध्द कल्पनाशक्तीचा वापर संशोधकाला करावा लागतो. एखाद्या घटनेविषयीचा निःसंदिग्ध सबळ पुरावा कागदपत्रातून मिळत नाही. अशा वेळी संशोधकाने अनुमान पध्दतीचा वापर करावयाचा असतो. त्या घटनेची ऐतिहासिक साधनांच्या आधारे पार्श्वभूमीअभ्यासून त्याला सुसंगत ठरेल, ऐतिहासिक साधनांच्या साच्यात चपखल बसेल असे तर्कशुध्द अनुमान संशोधकाने बांधायचे असते. उदा. राजीव गांधींच्या हत्येचे प्रकरण. त्यांची हत्या का करण्यात आली ? याचा निःसंदिग्ध सबळ पुरावा कागदपत्रांतून मिळत नाही. अशावेळी संशोधकाने अनुमान पद्धतीचा वापर करायचा असतो.

ऐतिहासिक संकलित कागदपत्रांचा बारकाईने अभ्यास केल्यानंतर त्यात काही त्रूटी जाणवली व ती ऐतिहासिक साधनांच्या आधारे भरून काढणे शक्य नाही याची खात्री झाल्यानंतर तर्कसंगत अनुमान करावे लागतात. त्या आधारे विधाने करावी लागतात. उदा. पेशवा दुसरा बाजीराव याच्या काळात पेशवे दरबारात गायकवाडांचा वकील म्हणून आलेल्या गंगाधरशास्त्रीची पंढरपूर येथे हत्या झाली. मारेकरी न सापडल्यामुळे हत्त्या कोणी व कशासाठी केली हे उघडकीस आले नाही. त्या विषयीचा लेखी पुरावाही मिळत नाही. अशावेळी त्या घटनेबाबत अनुमान लावून निष्कर्षाप्रत पोहचावे लागते.

सारांश असा की, संशोधन करीत असताना संकलित केलेल्या ऐतिहासिक साधनसामग्रीतून घटनांची क्रमवारी ठरत नसेल, पोकळी राहत असेल तेव्हा संशोधकाला स्वतःच अनुमान काढून निष्कर्षाप्रत पोहचावे लागते. ह्यालाच अनुमानीय प्रक्रिया म्हणतात. मात्र ह्यावेळी संशोधकाला एक काळजी घ्यावी लागते ती अशी की, ऐतिहासिक साधनांच्या चौकटीबाहेर पडू नये, किंवा आपल्या मतानुसार ऐतिहासिक मूळ कागदपत्रांत बदल करू नये. तसेच ऐतिहासिक साधनांत बसणार नाही असे अनुमान काढू नये. २) अन्वयार्थ (*Hermeneutics)*

या प्रक्रियेमध्ये संशोधक त्याला मिळालेल्या ऐतिहासिक साधनसामुग्रीचा नव्या दृष्टिकोनातून अभ्यास करून प्रस्थापित प्रमेयांहून भिन्न प्रमेये मांडण्याचा प्रयत्न करतो. उपलब्ध साधनसामग्रीचे पुनः परीक्षण करून प्रचलित मतापेक्षा वेगळा निष्कर्ष काढण्याचा संशोधकाचा प्रयत्न असतो. अनेकदा नवी सामग्री, नवा पुरावा हाती लागल्यामुळे नवे प्रमेय मांडण्यास पुष्टी मिळते. या प्रक्रियेत उपलब्ध माहितीचा नवा अन्वयार्थ लावण्याचा संशोधकाचा हेतू असतो. '*Hermeneutics*' हा ग्रीक शब्द आहे. हा शब्द '*Hermeneucin*' या शब्दापासून बनला आहे. याचा अर्थ '*Interpretation*' असा होतो. '*Interpretation*' याचा मराठीत 'अर्थ लावणे', 'लावलेला अर्थ' असा

अर्थ आहे. म्हणून ऐतिहासिक भाषेत '*Hermeneucis*' याचा अर्थ 'संकलित केलेल्यातथ्यांचा (*facts*) अन्वयार्थ लावणे' असा होतो.

ऐतिहासिक संशोधनासाठी मूळ कागदपत्रे संकलीत केल्यानंतर त्याचे परीक्षण केले जाते. परीक्षण करुन अन्वयार्थ लावला जातो. संकलित साधनांचे परीक्षण करुन अन्वयार्थ लावण्यासाठी जे संस्कार केले जातात, त्यापैकी अंतरंग परीक्षण महत्वाचे ठरते.

मूळ कागदपत्रांची विश्वासार्हता व स्विकारार्हता ठरविण्याच्या दृष्टीने अंतरंग परीक्षण महत्वाचे असते. कागदाचा लेखक, काळ व स्थळ याबाबत बाह्यांग परीक्षणाने खातरजमा करुन घेतल्यानंतर त्यातील आशयाची विश्वासार्हता ठरविणे हा अंतरंग परीक्षणाचा हेतू असतो. नानाविध प्रश्नांची उत्तरे शोधणे म्हणजे अंतरंग परीक्षण होय. विविध शंका उपस्थित करुन त्याचे निरसन झाले व नंतर जी

माहिती हाती आली ती महत्वाची असते. कारण हीच माहिती ऐतिहासिक घटीते किंवा पुरावा म्हणून संशोधक लेखनात वापरतो. मूळ ऐतिहासिक कागदपत्रांच्या परीक्षणानंतर हाती राहिलेली ऐतिहासिक माहिती म्हणजे ऐतिहासिक घटिते (*facts*) होत. हाच संशोधनपर इतिहासलेखनाचा मूळ आधार असतो. परंतु घटीते संशोधकाच्या हाती येवून ग्रंथ तयार होत नाही. त्याकरीता त्या घटितांची तर्कशुध्द, सुसूत्र जुळवाजुळव करुन त्याचा अन्वयार्थ लावावा लागतो. ह्या घटितांचे योग्य विश्लेषण करण्याकरीता अन्वयार्थ या प्रक्रियेचा वापर करतात. घटितांचा अन्वयार्थ लावल्यानंतर त्यांना शब्दबध्द करुन संशोधनाचे काम सुकर होते. कागदपत्रांच्या परीक्षणानंतर संशोधकाच्या हाती येणारी घटीते विस्कळीत स्वरुपाची असतात; त्यापैकी सर्वच विषयाच्या मांडणीसाठी उपयुक्त नसतात.

म्हणून कोणती घटिते विषयाच्या मांडणीसाठी उपयुक्त ठरतील आणि त्यांची जुळवाजुळव कशा प्रकारे करायची हा निर्णय सर्वस्वी संशोधकाला घ्यावा लागतो. सर्व मूळ व दुय्यम साधनांचा सखोल अभ्यास केल्यानंतर संशोधकाच्या मनात विषयाचा आराखडा तयार झालेला असतो. त्याला अनुसरुन महत्त्वाची घटिते निवडतो व बाकीची बाजूला करतो. यानंतर निवडलेली घटिते एका सूत्रात गोवण्यासाठी व त्यांचा योग्य अन्वयार्थ लावण्यासाठी घटिताची बरेचदा फेरमांडणी करावी लागते. ही मांडणी सुसूत्रपणे झाल्यानंतर त्यावर अन्वयार्थ प्रक्रिया करुन भाष्य केले जाते. परिणामी संशोधन पूर्णत्वास नेण्यास मदत होते. सारांश, ऐतिहासिक वर्गीकरण करुन महत्त्वाची माहिती निवडली जाते. निवडलेली माहिती म्हणजे ऐतिहासिक घटिते होत. अशा निवडलेल्या माहितीची मांडणी झाली की इतिहासकार/संशोधक आपल्या परिप्रेक्ष्यानुसार त्यांचा अन्वयार्थ लावतो. तेच त्याचे भाष्य असते. इतिहासकार/संशोधक ज्या विशिष्ट पध्दतीने ऐतिहासिक माहितीची मांडणी करतो. त्यातूनच त्याचे अन्वयार्थ किंवा भाष्य साकार होते.

"*Hermeneutics*" ह्या शब्दाचा अर्थ ऑक्सफर्ड इंग्लीश डिक्शनरीमध्ये दिला आहे. तो असा की, "*Hermeneutics' means "the branch of knowledge that deals with (theories of) interpretation, esp. of scripture.*" इतिहास ही शास्त्रीय पध्दतीने कार्य करणारी ज्ञान शाखा आहे. शास्त्रांप्रमाणेच सत्याचा शोध हे इतिहासाचे अंतिम उद्दिष्ट असतेआणि सत्याचा शोध घेण्यास प्रवृत्त करणारी जिज्ञासा मानवी जिवनात गतकाळात काय-काय घडले ते शोधून काढण्याची इच्छा माणसात जागृत करते. जिज्ञासापूर्तीसाठी ते का घडले ? याचे स्पष्टीकरण करावे लागते. तेव्हाच इतिहास लेखन अर्थपूर्ण ठरते. म्हणजेच इतिहास लेखकाला प्रत्येक कृतीमागील, घटनेमागील कारणांचा शोध घेणे अगत्याचे असते यालाच घटनांची कारणमिमांसा किंवा स्पष्टीकरण म्हणतात.

कारणमिमांसा हा इतिहासलेखनातील अतिशय महत्त्वाचा घटक आहे. यामुळे घटना अर्थपूर्ण बनतात आणि घटनांचे आकलन समर्पकपणे होते. 'कारणमिमांसा' (*Causation*) ह्या शब्दाचा पर्यायी शब्द म्हणून काही ठिकाणी 'इतिहासाचे भाष्य' किंवा 'अन्वयार्थ' (*Interpretation*) हा शब्द वापरला जातो. कारणमिमांसा ही केवळ कारणांचा शोध घेण्याची प्रक्रिया आहे. कारणे शोधून काढल्यानंतर त्यांची मांडणी ज्या दृष्टिकोनातून, ज्या परिप्रेक्ष्यातून संशोधक करतो, जी कारणे अधोरेखीत करतो, ज्या काही कारणांना अग्रक्रम व इतरांना गौण स्थान देतो, त्यावरुन त्याचे इतिहास विषयासंबंधीचे भाष्य स्पष्ट होते. तो त्याने घटनांचा लावलेला अन्वयार्थ असतो.

३.२ संश्लेषणात्मक प्रक्रिया (*Synthetic Process*) संश्लेषात्मक प्रक्रिया ही ऐतिहासिक संदर्भ साधने संकलित करण्याशी

निगडीत आहे. ऐतिहासिक कागदपत्रे गोळा करण्यासाठी संशोधक वेगवेगळ्या पध्दतींचा उपयोग करतो. वेगवेगळ्या पध्दतीने जमविलेल्या माहितीचे वर्गीकरण करतो, परीक्षण करतो आणि त्या सर्वांचे संयोगीकरण करुन, त्यावर प्रक्रिया करुन संशोधनास उपयुक्त अशी निवडक माहिती वेगळी करतो. सर्व प्रक्रियेनंतर हाती राहिलेली ऐतिहासिक माहिती म्हणजे ऐतिहासिक घटिते (*facts*) होत. '*Facts*' यालाच संशोधनाच्या भाषेत 'तथ्य' असे म्हणतात.

संशोधनाच्या दृष्टिने तथ्य महत्वाचे असते. संश्लेषणात्मक प्रक्रिया ही तथ्य संकलनाशी निगडीत आहे. म्हणूनच तथ्य संकलनाबाबतची माहिती, व्याख्या, महत्व अभ्यासणे गरजेचे ठरते.

ऐतिहासिक संशोधनाची शास्त्रीय पध्दत ही शुध्द, वस्तुनिष्ठ पध्दतीने संकलित केलेल्या तथ्यांच्या संकलनावर आधारित असते. संपूर्ण संशोधन प्रक्रियेत तथ्य संकलन हा सर्वात मोठा आणि महत्त्वाचा भाग असतो. तथ्यांना संशोधनात विशेष आणि एकमेवाद्वितीय महत्व असल्याने तथ्याचा अर्थ, स्वरूप, महत्व आणि तथ्यांचे स्रोत अभ्यासणे हा संशोधनाच्या पूर्वतयारीतील महत्त्वाचा भाग असतो. तथ्य संकलनाच्या आधारे निघणारे निष्कर्ष वस्तुनिष्ठ असतात. त्यामुळे संशोधनाचा दर्जा उंचावण्यास मदत होते.

ऐतिहासिक संशोधनात संशोधकाने एखाद्या घटनेची सत्यता जाणून घेण्यासाठी तथ्यांचा शोध घेणे, ती संकलित करणे आवश्यक असते. शास्त्रीय पध्दतीने तथ्य संकलन करुन त्यांचे वर्गीकरण आणि विश्लेषण केल्यानंतर वस्तुस्थितीदर्शक निष्कर्ष मांडले जातात. संशोधनाच्या अंतिम टप्प्यात मांडले जाणारे निष्कर्ष आणि सिध्दांत हे तथ्यांवर आधारित असतात.

संपूर्ण संशोधन हे तथ्य संकलनावरच अवलंबून असते. त्यामुळे तथ्य अतिशय महत्त्वाची ठरतात. तथ्यांचे महत्व स्पष्ट करताना विविध अभ्यासकांनी व्याख्या केलेल्या आहेत. त्या खालीलप्रमाणे -

श्रीमती पॉलीन यंग "ज्यांची खात्रीने पुष्टी करता येईल अशा भौतिक, शारीरिक, मानसिक आणि भावनात्मक घटना म्हणजे तथ्य होय. तथ्यामंध्ये मूर्त वस्तूप्रमाणेच विचार,

केल्यानंतर वस्तुस्थितीदर्शक अनुभव आणि भावनांचादेखील समावेश होतो भाषांच्या प्रांतात सत्य म्हणून स्विकार केला जातो."

गुड आणि हॅट "तथ्य एक अनुभवसिध्द सत्यापनिय निरीक्षण होय."

दुर्खीम - "सामाजिक तथ्य वर्तनाचा (विचार, अनुभव किंवा कृती) असा प्रांत आहे की, ज्याचे वस्तुनिष्ठ रुपात निरीक्षण करणे शक्य असते आणि वर्तनाचे स्वरूप बाध्य किंवा बंधनात्मक असते." फेअर चाईल्ड - "तथ्य ही अशी घटना आहे की, जिचे निरीक्षण आणि मापन करण्याबाबत समाजात सहमती आढळते."

तथ्याबाबत अशा काही प्रतिनिधीक स्वरुपाच्या व्याख्यांमधून तथ्याचा व्यापक अर्थ समजायला मदत होते. वरील व्याख्यांतून मानवव्यशास्त्रांशी निगडीत असलेल्या विषयांचे संशोधन करण्यासाठी तथ्यांचे महत्व स्पष्ट होते.
इतिहासामध्ये घटनांना किंवा प्रो. इ. एच. कार यांच्या शब्दांत 'घटितां'ना फार महत्व असते. इतिहास हा अनेक घटना व संकल्पना यांचा बनलेला असतो. या घटना किंवा घटिते व संकल्पना यांना कोणत्या ना कोणत्या धाग्यामध्ये एकत्र जोडणे आवश्यक असते. इतिहासाला आकार निर्माण होण्यासाठी काही तात्वीक बैठक असावी लागते. अन्यथा ऐतिहासिक घटना एकावर एक ठेवलेल्या ठोकळ्यासारख्या वाटतील. म्हणून इतिहास लेखन प्रक्रियेमध्ये ऐतिहासिक घटना यांना महत्व आहे.

ऐतिहासिक घटनांची सत्यता जाणून घेण्यासाठी तथ्ये अत्यंत महत्वाची असतात. म्हणूनच तथ्यांबाबतची माहिती अभ्यासणे अगत्याचे ठरते.

१) तथ्यांची निवड

इतिहास म्हणजे भूतकाळात घडून गेलेल्या मानवी जीवनातील घटना, घडामोडी होय. भूतकाळात घडलेल्या घटनांच्या घडामोडींचे, बदलांचे दर्शन इतिहासग्रंथ करतात. एकंदरीत भूतकाळात पडद्याआड गेलेल्या मानवी जीवनातील घटनांचा व परिवर्तनाचा अभ्यास ऐतिहासिक लिखाणात, संशोधनात येतो. त्या घटनांची सुसंसगत मांडणी करण्यासाठी, संशोधन करण्यासाठी साधनसामग्रीची आवश्यकता असते.

संशोधनाकरीता ऐतिहासिक साधनसामग्री ही कागदपत्रे, इमारती, मंदिरे, कलाकृती, कलावस्तू इत्यादींच्या रुपात उपलब्ध असते. गतकाळात घडून गेलेल्या घटनांचे ज्ञान अप्रत्यक्षपणाने होते. तेव्हा तसे ज्ञान प्राप्त करण्यासाठी तत्कालीन कागदपत्रे, वस्तू इ. महत्वाची ठरतात. ह्या साधनसामुग्रीच्या आधारेच संशोधक गतकाळाची पुनर्निर्मिती करु शकतो. ही ऐतिहासिक साधनसामग्री म्हणजेच इतिहासलेखकाचा, संशोधकाचा कच्चा माल (ऐतिहासिक साधनसामग्री वेगवेगळ्या ठिकांणाहून निवडावा लागतो.

इतिहासलेखकाचे, संशोधकाचे काम बांधकाम करणाऱ्या स्थापत्य तज्ज्ञासारखे असते. तो ज्या पध्दतीने इमारती उभी करण्यासाठी कच्चा आराखडा तयार करतो, त्यासाठी कोणता कच्चा माल लागेल, तो कोठे उपलब्ध होईल, याची माहिती काढून त्या वस्तू एकत्र जमवितो. नंतर जमविलेल्या वस्तूंमधून खात्रीलायक वस्तू हव्या त्या प्रमाणात निवडतो व त्याचा वापर करुन टप्प्याटप्प्याने इमारत उभी करतो. त्याप्रमाणेच इतिहास संशोधकाला संशोधन करताना आवश्यक ती ऐतिहासिक साधनसामग्री वेगवेगळ्या ठिकाणाहून संकलित करावी लागते. संकलित केलेल्या साधनांमधून आपल्या संशोधकाला ऐतिहासिक साधनांची (तथ्यांची) निवड ही महत्त्वाची ठरते. त्या निवडलेल्या तथ्यांच्या आधारेच संशोधक आपली ग्रंथरुपी इमारत उभी करु शकतो.

तथ्यांची निवड

ऐतिहासिक स्त्रोत साधनांचे स्वरूप, त्यांचे भिन्न प्रकार, त्या प्रकारांचे तौलनिक महत्व आणि त्या मुद्द्यांचा योग्यरित्या वापर इत्यादी मुद्द्यांचा सखोल व सर्वांगिण विचार करुन संशोधकाला ऐतिहासिक तथ्यांची निवड करावी लागते. निवडलेल्या तथ्यांच्या सहाय्याने संशोधनाचे, ग्रंथलेखनाचे काम पूर्णत्वास न्यावे लागते. त्याकरीताच ऐतिहासिक तथ्यांच्या निवडीची प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची ठरते.

संशोधकाला लागणारी ऐतिहासिक साधनसामुगी एकत्रितपणे, एकाच ठिकाणी मिळत नाही. ती अनेक ठिकाणी विखुरलेल्या विस्कळीत स्थितीत असते. ही सामग्री बहुधा अस्पष्ट, अशुध्द, तुटपूंजी असते. त्यातून समर्पक सामग्रीची निवड करण्याचे व त्याचे खात्रीलायक पुरावा म्हणून रुपांतर करण्याचे काम संशोधकाला करावे लागते. म्हणूनच तथ्य निवडण्याचे काम अतिशय जिकिरीचे आणि बौध्दीक कौशल्याचे असते असे मानले जाते. ते निवडण्याचे काम संशोधकाला करावे लागते. ऐतिहासिक तथ्यांची निवड करण्याचे काम संशोधकासमोर आव्हान म्हणून उभे असते. कारण भूतकाळ अमूर्त असतो, अदृश्य असतो. काळाच्या ओघात काही पुरावे नष्ट झालेले असतात. काही पुरावे अनेक स्थळी विखुरलेल्या, विस्कळीत अवस्थेत असतात. जे पुरावे हाती लागतात ते विश्वसनिय असतीलच याची खात्री नसते. अशा सगळ्या अडचणींना तोंड देत संशोधकाला पुराव्यांचे संकलन करुन त्यांची निवड करण्याचे काम करावे लागते. ह्या संदर्भात संशोधकापुढे असणाऱ्या अडचणींबाबत डेव्हिड लॉथेवाल हे गतकाळाला 'परदेश' असे म्हणतात. 'परदेश' याचा त्यांना अभिप्रेत असलेला अर्थ 'अज्ञात जग' असा आहे. जॉफ्रे बॅरक्ला यांनीही आपल्या *'History in Changing World'* ह्या ग्रंथात संशोधकाच्या हाती येणाऱ्या पुराव्याचे वर्णन 'अपूर्ण, सदोष, तुटपूंजे' असे केले असून ह्या तोकड्या व विस्कळीत पुराव्यातून गतकाळातील महत्त्वाच्या लक्षणीय घटनांचा शोध घेण्याचा संशोधक प्रयत्न करतो असे मत मांडलेले आढळते. प्रा. मेटलंड देखील इतिहासाचे रूप गतकाळापेक्षा लहान असते कारण त्याचे केवळ काही तुकडेच इतिहासकाराच्या हाती पडतात. (*"History is less than the past: historians can only recover fragments."*) असे मत मांडताना दिसतात. इतिहास संशोधनासाठी वापरावयाच्या साधनसामग्रीचा ऊहापोह आर्थर, मार्विक यांनी '*The Nature of History*' ह्या ग्रंथात तपशिलाने केलेला आहे. ऐतिहासिक सामग्री कोठे शोधायची, त्यांचे मूलभूत स्वरुप काय असते, त्याचा वापर संशोधकाने कसा करावयाचा आणि अशा साधनसामग्रीशिवाय इतिहास लिहिता येत नाही का, असे अनेक प्रश्न संशोधकाला पडतात. यावर ते म्हणतात, "केवळ साधनांचा अभ्यास इतिहास लेखनासाठी पुरेसा नाही, मात्र त्याखेरीज इतिहास आकार घेत नाही हेही तितकेच सत्य आहे."

सारांश ऐतिहासिक स्त्रोत साधनांचे स्वरूप, त्यांचे भिन्न प्रकार, त्या प्रकारांचे तौलनिक महत्व आणि त्या मुद्द्यांचा योग्यरित्या वापर इत्यादी मुद्द्यांचा सखोल व सर्वांगिण विचार करुन संशोधकाला ऐतिहासिक तथ्यांची निवड

करावी लागते. निवडलेल्या तथ्यांच्या सहाय्याने संशोधनाचे, ग्रंथलेखनाचे काम पूर्णत्वास न्यावे लागते. त्याकरीताच ऐतिहासिक तथ्यांच्या निवडीची प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची ठरते.

२) तथ्यांची बांधणी

इतिहास संशोधकाने संशोधनासाठी निवडलेल्या साधनसामग्रींना वेगवेगळ्या गटात बांधणी करावी लागते. शास्त्रीय पध्दतीने इतिहासाचे लेखन करण्यासाठी, संशोधन करण्यासाठी ऐतिहासिक साधनांची वर्गवारी करावी लागते. निवडलेल्या ऐतिहासिक तथ्यांची बांधणी करावी लागते.

इतिहास संशोधन प्रक्रियेचा सखोल अभ्यास केलेल्या तज्ज्ञांनी निवडलेल्या स्रोत साधनांची (तथ्यांची) बांधणी करण्यासाठी प्रामुख्याने दोन भागात वर्गीकरण केलेले आढळते. म्हणजेच संशोधकाला तथ्यांची बांधणी त्या दोन भागात करुन संधोधनाचे कार्य करावे लागते.

ते मुख्य दोन गट पुढीलप्रमाणे सांगता येतील. अ) मूळ किंवा प्राथमिक साधने

इतिहासाच्या संशोधनाच्या दृष्टीने मूळ किंवा प्राथमिक साधने अत्यंत महत्त्वाची असतात. मूळ साधनांशिवाय इतिहास मूर्त रुप घेत नाही. मूळ साधने ही अव्वल दर्जाची साधनसामग्री मानली जाते. मूळ साधनांचे सुद्धा लिखीत व अलिखीत साधने अशा दोन भागात विभागणी केली जाते.

मूळ साधनांत लिखीत साधनसामग्रीमध्ये पुढील गोष्टींचा अंर्तभाव होतो. संशोधक ज्या काळातील विषयाचा अभ्यास करीत असेल, त्या काळातील समकालीन साधने ही अव्वल दर्जाची असतात.

संशोधक एखाद्या घटनेचा किंवा प्रसंगाचा अभ्यास करीत असेल तर, त्या घटनेत सहभागी असलेल्या व्यक्तींची, त्यासंबंधीची कागदपत्रे मूळ साधनांत मोडतात. त्या घटनेत सहभागी नसलेली, परंतु ती घटना प्रत्यक्ष डोळ्यांनीपाहिलेल्या व्यक्तींनी त्याचवेळी लिहून ठेवलेली कागदपत्रे ही मूळ साधने होत.

अभ्यास विषयाच्या काळातील एखाद्या व्यक्तीने लिहून ठेवलेले आत्मवृत्त, दिनवृत्त हेदेखील मूळ साधन ठरते. त्या काळातील एखाद्या व्यक्तीने समकालीन व्यक्तीसंबंधी केलेले लिखाणही मूळ साधन मानले जाते.

ह्या लिखीत मूळ साधनांव्यतिरीक्त समकालीन वस्तुरुप साधने इमारती, स्थापत्य, मंदिरे, पुरावशेष, मूर्ती, नाणी इत्यादींचा देखील मूळ साधनांच्या वर्गात समावेश होतो.

प्रा. कार्ल गुस्तावन यांनी मूळ साधनांची व्याख्या, "केवळ एका ठिकाणी सापडणारी, त्याखेरीज इतरत्र न सापडणारी, मूळ स्वरुपातील, त्यात कोणताही बदल न झालेली, किंवा त्यावर कोणतीही प्रक्रिया न झालेली समकालीन साधने" अशी आपल्या '*A Preface to History*' ह्या ग्रंथात केलेली आहे. गतकाळातील लिखीत साधने हस्तलिखिताच्या स्वरुपात मिळतात. ही साधने समकालीन असल्यामुळे, अभ्यासाच्या विषयाशी, काळाशी संबंधीत असल्यामुळे, विषयांशी, संबंधीत *Preface to History* व्यक्तींशी, व्यक्तींची असल्यामुळे ती अधिक ठरतात. म्हणून समकालीन मूळ साधने अव्वले दर्जाची मानली विश्वासपात्र जातात.

लिखित साधनांबरोबरच सहाय्यकशास्त्रांनी प्रकाशात आणलेली वस्तुरुप साधने अलिखित मूळ साधनांमध्ये मोडतात. उदा. उत्खननातून मिळालेले खापराचे तुकडे, मूर्ती, अवजारे, मूर्तीचे भग्नावशेष, नाणी वगैरे गोष्टी अलिखीत अव्वल साधने मानली जातात. याशिवाय अलिकडे दूरदर्शनवर येणारी बातमीपत्रे, छायाचित्रे, चित्रफिती, ध्वनिफिती, विमानातून घेतलेली भूपृष्ठांवरील छायाचित्रे, किंवा सागरी पुरातत्वीय माहिती ही सर्व अलिकडच्या काळातील प्राथमिक साधने मानली जातात.

ब) दुय्यम साधने

ऐतिहासिक साधनांची वर्गवारी किंवा बांधणी दुय्यम साधनात केली जाते. एकोणिसाव्या शतकात इतिहासतज्ज्ञांनी काही निकषांच्या आधारे दुय्यम साधनांची बांधणी केली आहे. त्यानुसार दुय्यम स्वरुपाची साधने म्हणजे - एखादी घटना घडून गेल्यानंतर अनेक वर्षांनी केवळ स्मरणशक्तीच्या आधारे लिहिलेले ग्रंथ. गतकालीन घटनेबाबत केवळ ऐकिव माहितीच्या आधारे लिहिलेलेग्रंथ. प्राथमिक स्वरुपाच्या साधनांची चिकित्सा करुन विश्वासार्ह ठरलेल्या पुराव्याच्या आधाराने विषयाची तर्कसंगत मांडणी करुन लिहिलेले

ग्रंथ. हे दुय्यम साधनांच्या वर्गात मोडतात. मूळ व दुय्यम साधनांचे संशोधक व वाचकांच्या दृष्टिने असणारे महत्व आर्थर मार्विक यांनी समर्पकरित्या स्पष्ट केले आहे. ते म्हणतात की, "प्राथमिक साधन हा कच्चा माल असून तो सामान्य वाचकापेक्षा संशोधकाला अधिक मोलाचा असतो. दुय्यम साधन हे मूळ साधनांवर आधारलेले असले तरी असे ग्रंथ माहिती देणारे असल्यामुळे बुद्धिमान सामान्य वाचकाला तसेच संशोधकाला मोलाचे ठरतात." कीथ जेन्किन्सच्या '*Rethinking History*' या इतिहासलेखन प्रक्रियेवरील चिकित्सक ग्रंथात, "दुय्यम साधनांतून कधी- कधी इतकी मूळ स्वरुपाची माहिती मिळते की, त्यामुळे प्राथमिक व मूळ साधनांमधील भेद गळून पडतो." असे विधान केलेले आढळते. इतिहास विषयाबाबत केलेले अतिशय मौलिक स्वरुपाचे चिंतनपर लिखाणही दुय्यम साधनात समाविष्ट केले जाते. तसेच मूळ हस्तलिखितावर भाष्य करणारे, त्याचे स्पष्टीकरण देणारे व चिकित्सक विवेचन देणारे ठरतो.

लेखनही दुय्यम साधने मानली जातात. दुय्यम साधनांचा वापर चार कारणांसाठी संशोधकाला खूपच उपयुक्त विषयाचे सखोल ज्ञान घेण्यासाठी आणि त्या विषयाची प्राथमिक चौकट करण्यासाठी संशोधकाला प्रथम दुय्यम साधने अभ्यासावी लागतात. विषयाच्या उपलब्ध माहितीत कोणत्या उणिवा आहेत, कोठे माहितीच्या रिकाम्या जागा भरायच्या आहेत, नव्या स्पष्टीकरणास कोठे वाव आहे याची संशोधकाला कल्पना मिळते व यामुळे त्याच्या शोधकार्याला नवी दिशा मिळण्याची शक्यता असते. दुय्यम ग्रंथांच्या वाचनामुळे अधिकाअधिक संदर्भग्रंथांची माहिती होते व त्यामुळे वाचनाचे क्षेत्र विस्तारत जाते. विषयाची मांडणी करताना विद्वानांनी त्याबाबत व्यक्त केलेल्या मतांची अवतरणे देण्यासाठी दुय्यम साधनांचे वाचन मोलाचे ठरते. यामुळेच संशोधन कार्याचा श्रीगणेशा संशोधकाने दुय्यम साधनांच्या वाचनाने करावा असा इतिहासतज्ज्ञ सल्ला देतात.

सारांश, संशोधकाने संशोधनासाठी संकलित केलेल्या ऐतिहासिक तथ्यांची बांधणी प्राथमिक व दुय्यम साधनांमध्ये करुन आपल्या संशोधनास पूर्णत्वास नेण्याचा प्रयत्न करावा लागतो. ऐतिहासिक तथ्यांची बांधणी केल्याशिवाय संशोधकाला संशोधनाची सुरवात करणे कठीण जाते. म्हणून ऐतिहासिक तथ्यांची बांधणी करणे संशोधनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे.

३) तथ्यांचे रचनात्मक सादरीकरण संशोधनाला विधायक रुप देण्यासाठी, ग्रंथाची रचना करण्यासाठी तथ्यांची बांधणी करुन त्यांचे सादरीकरण संशोधकाला करावे लागते. ऐतिहासिक सामुग्री संकलनाच्या वेगवेगळया पद्धतींचा वापर करुन विधायक, ग्रंथरचना करु शकणाऱ्या तथ्यांची निवड करता येते. म्हणूनच ऐतिहासिक सामग्री संकलित करुन संशोधनाला विधायक, रचनात्मक दृष्टीने तथ्यांचे सादरिकरण करावे लागते. त्याकरीता तथ्य संकलनाच्या विविध पद्धतींची माहिती पाहणे अगत्याचे ठरते.

इतिहासलेखनाचा मूळ आधार म्हणजे ऐतिहासिक साधन सामग्री होय. ह्या साधनसामग्रीतून संकलीत केलेल्या माहितीच्या आधारे इतिहास लिहिता येतो. ऐतिहासिक साधनसामग्री विषयाची चौकट तयार करते, त्यात तपशिल भरुन इतिहासाला ग्रंथाचा आकार देते.